*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

# Unit 8
# Professional Ethics

## प्रकरण 8
## व्यावसायिक नीतिशास्त्र



8.1. धंदा आणि व्यवसाय यातील फरक

8.2. वकील, शिक्षक, विद्यार्थि,डॉक्टर्स, व्यापारी यांची नैतिक कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

### प्रस्तावना :

तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांचा अभ्यास करताना आपण असे पाहिले की नीतिशास्त्र ही शाखा मुख्यत: 'नैतिकता' या संकल्पनेचा अभ्यास करते. कशास नैतिक म्हणावे, कोणती कृती कशामुळे नैतिक ठरते,याचे निकष सतत बदलत जातात.आता नीतिनियम सतत बदलतात असेही आढळते. पण नीति अशी कायम बदलती असावी का ? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.या सगळया पेचामध्ये / तणावांमध्ये समाज नेहमीच गोंधळतो. नवे शोध घेतो,आणि त्यातूनच गेल्या काही वर्षात आणखी एक नैतिक सिध्दांत पुढे आला. तो म्हणजे उपयोजित नीतिशास्त्र.

### परस्परावलंबितता आणि विशेषीकरण

गेल्या 50 वर्षात तत्त्वज्ञानाच्या इतर कोणत्याही शाखेचा विकास झाला नाही इतका विकास उपयोजित नीतिशास्त्राचा झाला. विशेषत: दुसऱ्या महायुध्दानंतर जीवनाच्या अनेक क्षेत्रातील प्रश्न पाश्चात्यांमध्ये व युरोपमध्ये जास्त उग्र झाले. 20 वे शतक मानवजातीच्या आयुष्यात अतिशय महत्वाचे व भयानक वेगाचे ठरले. अनेक गोष्टींचे संदर्भच बदलले.शहरीकरण,उद्योगधंद्याची वाढ आणि कमाल पातळीवर पोहोचलेल्या परस्परावलंबी जीवनशैलीमुळे संकीर्ण आणि वस्तुनिष्ठ समस्या निर्माण झाल्या.1990 नंतर जागतिकीकरणाच्या लाटेने आणखी नवेच नैतिक प्रश्न निर्माण केले.

रासायनिक -आण्विक - जैविक अस्त्रे, संगणकीय यंत्रणा,जीवतंत्रज्ञान,माहिती तंत्रज्ञान, शेती, जंगले, मोठ्या धरणांचे महाप्रकल्प, इत्यादीबाबतची प्रगत देशांची धोरणे,त्या धोरणांचे इतर देशांवर होणारे अतिक्रमण स्वरुपाच्या जास्तच गुंतागुतीच्या जटील नैतिक समस्या निर्माण झाल्या.विषमता, अन्याय, आत्महत्या, गर्भपात, स्वेच्छामरण, प्राण्यांचे मुक्त आंदोलन,कामसंबधातील नीती, हे प्रश्न ऐरणीवर आले.

या सगळयांचा परिणाम म्हणून व्यक्तिगत व सामाजिक जीवन अत्यंत गुंतागुंतीचे व समस्या प्रधान बनले.पण या समस्या केवळ शुध्द चारित्र्य, सद्हेतू,सद्सद विवेक,बुध्दिमत्ता,परोपकारवाद इत्यादी आदर्शवादी नैतिक धारणांच्या आधारे सोडविता येणार नाहीत, हे उघडच आहे .

दुसरीकडे घडते असे आहे की, आज प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान हे ' विशेषज्ञान ' बनत आहे. ज्ञानात विशेषीकरण आले आहे. त्यामुळे एखादया ज्ञानशाखेतील समस्यांची उत्तरे त्याच ज्ञानशाखेतील व्यक्ती देऊ शकते, असे घडत नाही.या समस्या सोडविण्यासाठी त्या - त्या विषयातील तज्ञांचा सल्ला, त्यातील प्रगतशील इ

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

ाान व परिणाम यांचे ज्ञान आवश्यक आहे, याचे भान आले.तत्त्वचिंतन व इतर ज्ञानशाखा यांच्यात गंभीर आंतरसंवाद सुरु झाला. साहजिकच उपयोजित नीतिशास्त्राला एक व्यापक 'आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखा' (Interdisciplinary Discipline) असा स्वतंत्र दर्जा मिळाला.याचाच अर्थ नव्या नैतिक समस्या सोडविण्यात सर्वांनी सहभाग देण्याची चळवळ सुरु झाली.तत्त्वज्ञांच्या विचारकक्षेची पातळी रुंदावली.त्यांचा जनसंपर्क वाढला.



थोडक्यात, जीवनाला थेटपणे भिडणाऱ्या नैतिक समस्या सोडविण्यासाठी नैतिक सिध्दांताचे आणि तत्त्वज्ञानात्मक पध्दतीचे उपयोजन करणारी ही तत्त्वज्ञानाची शाखा आहे.नैतिक सिध्दांत आणि व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न उपयोजित नीतिशास्त्र करते आणि गरज असल्यास नवा सिध्दांत मांडते.नैतिक संकल्पनांचा थेट जीवनाशी संबंध जोडुन मानव,जग,निसर्ग,प्राणी व वनस्पतीसृष्टी यांच्यातील 'जैविक आंतरसंबंधाचा' (organic interrelationship) शोध घेते, त्यांचा अतिशय प्रेमाने व सहानूभूतीने विचार करते.यातून उपयोजित नीतीशास्त्राच्या तीन मुख्य शाखांचा उदय झाला.

(1) पर्यावरणाचे नीतीशास्त्र (Environmental Ethics)

(2)जैववैद्यक नीतीशास्त्र (BioMedical Ethics)

(3) व्यावसायिक नीतीशास्त्र (Professional Ethics).

## व्यवसाय आणि धंदा यातील फरक :

### धंदा (Business) :

धंदा हा केवळ पैसा मिळविणे याच एकमेव हेतूसाठी केला जातो.मालक, मालकवर्ग किंवा गुंतवणूकदार यांनाच फायदा कसा होईल, हीच एकमेव ध्येय धंदयामागे असतो.मग त्यासाठी कोणतेही बंधन पाळले जात नाही.सामाजिक जबाबदारीचे भान धंद्यात विकसित होत नाही.

हा धंदा मग समाजविरोधी कृत्ये करण्यासाठीही केला जावू शकतो.त्यामुळे खून, मारामारी, स्फोट, घातपात, चोरी,दरोडे,वाटमारी,अमली पदार्थाचा व्यापार,वेश्याव्यवसाय अथवा लोकांना काहीतरी विकून फसवित राहाणे इत्यादीचा धंदा होतो.गुंडगिरी,भाईगिरी,अम्मागिरी,दहशतवादी कृत्ये हा धंदाच असतो.(उदा.गॉडफादर, गॉडमदर, वास्तव, परिंदा, कार्पोरेट, कंपनी,दस,अपहरण इत्यादी सिनेमे.) धंदा करण्याचे केवळ तोटेच असतात, फायदे नसतात.

काही ठळक तोटे पुढीलप्रमाणे :

1. अशी व्यक्ति समाजाची घटक होवू शकत नाही.
2. समाजविरोधी कृत्य असल्यास कायदेशीर गुन्हेगारीचा शिक्का बसतो.
3. व्यक्तिची नैतिक पत,प्रतिष्ठा नाहीशी होते.
4. हा पैसा ती व्यक्ति ज्यासाठी मिळवित असते ते कुटूंब नावाची गोष्टच अशा धंदेवाईकांकडे उरत नाही.
5. समाजाची फसवणूक होतेच पण स्वत:चीही फसवणूक होते.
6. तो स्वत:पासूनही तुटतो.
7. धंदेवाईक माणूस अखेरिस एकटा पडतो,समाजापासून दूर जातो.
8. कदाचित मृत्यू हाच सुटकेचा मार्ग उरतो. मग जगण्याची संधी संपते.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

---

## व्यवसाय (Profession )

धंद्याच्या उलट व्यवसायाचे स्वरुप असते.व्यवसायामागे पुढील वैशिष्ट्याचा समावेश होतो.

1. 'सेवाभाव' गृहीत धरलेला असतो.तीच मुख्य प्रेरणा असते.
2. व्यवसायाचे शिक्षण व प्रशिक्षण ही अनिवार्य अट असते.
3. व्यवसायाचे दोन प्रकार :

   अ) थेट व्यवसाय : डॉक्टर, वकिल, व्यापारी, उद्योगधंदा,सेवावस्तू निर्माता आणि पुरवठादार इ.

   ब) नोकरी: शिक्षक,सरकारी,निमसरकारी, खासगी नोकरवर्ग, कर्मचारी, अधिकारी, पोलिस, लष्कर, न्यायाधीश, तसेच नगरसेवक ते पंतप्रधान व राष्ट्रपती, राजकीय अथवा सामाजिक पक्ष,एनजीओ,संघटीत किंवा असंघटीत नोकरवर्ग
4. सेवा केल्याबद्दल सेवेचे मूल्य व्यावसायिकास मिळत असते .
5. या सेवामूल्याचे दोन प्रकार :

   व्यवसाय प्रकारानुसार अनुक्रमे ङ

   अ ) शुल्क आकारणे

   ब ) वेतनलाभ घेणे
6. या वरील घटकांनी व्यवसाय तयार होतो.

समाजाची सेवा करणे हा मुख्य हेतू आणि प्रेरणा असते. अर्थात लोकमान्यता, सामाजिक प्रतिष्ठा, जातजमातीविषयक निष्ठा,कलात्मक प्रेरणा,शत्रुत्व-मित्रत्व भावना,सत्तेची लालसा आणि केवळ करुणेपोटी समाजसेवा याही गोष्टी व्यवसायामागे असतात.

### धोके :

- सेवाभाव हा घटक वगळला जावून 'धंदा करणे ' हा दृष्टिकोन थेट व्यवसायात जास्त येवू शकतो.
- दुसऱ्या प्रकारच्या व्यवसायात ' सेवालाभ तसे मूल्यदान ' आणि ' सेवा तसे मूल्य ' ही दोन तत्त्वे अयोग्य रितीने आचरणात आणल्यास त्यात अनैतिकता घुसते.
- व्यापारीकरण, चंगळवादाचा खरा धोका व्यवसायक्षेत्रास असतो.त्यामुळे बरेच सेवाव्यवसाय धोक्यात आले असून त्यांची विश्वासार्हता संपत चालली आहे !
- विशेषत: वैद्यक व्यवसायाची आज तीच शोकांतिका झाली आहे.वकिलीव्यवसायास, शिक्षणक्षेत्रास ती लागण झाली आहे.
- समाजकारण व राजकारण ही क्षेत्रे तर विविध पातळ्यांवर धंदेवाईक झाल्याने मोठे धोक निर्माण झाले आहेत.

## व्यावसायिक नीतिशास्त्राचे स्वरुप

व्यावसायिक नीतिशास्त्र विविध व्यवसायानुसार नैतिक तत्त्वांचे स्वरुप ठरविते.कोणत्या व्यवसायात कोणती नैतिक तत्त्वे सदगुण ठरतात किंवा कोणती ठरत नाही, हे ठरविते. एखादा व्यावसायिक व्यवहार नैतिक व्हावा, म्हणून कोणत्या नीतितत्त्वांची आवश्यकता आहे. त्याचा खुलासा आपणास 'चांगले व्यावसायिक' या संकल्पनेत मिळतो.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

---

दुसरी बाजू अशी की त्या त्या व्यवसायात झालेल्या विज्ञान,तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ज्या नवीन समस्या उत्पन्न झाल्या आहेत त्याचां विचारही या नीतीला करावा लागते. आण्विक व रासायनीक अस्त्रे , जैवतंत्रज्ञान , माहिती तंत्रज्ञान यातील प्रगतीमुळे ते व्यवसाय व पर्यायाने मानवी जीवन गुंतागुंतीचे झाले आहे. या समस्या केवळ सदसद्विवेकबुध्दीने , शुध्द चारित्र्याने सोडविता येत नाहीत.त्यासाठी त्या विषयातील तज्ञांचे सहकार्य घ्यावे लागले.त्यातून विविध व्यवसायांचे उपयोजित नीतीशास्त्र विकसित झाले आहे.



या सगळ्या बाजू लक्षात घेण्याचे कारण काय ? तर तत्त्वज्ञान हा विषय नेहमी वयक्ति व समाज यांची कृती व तिचा अर्थ यांचा म्हणजेच साध्य व साधन या दोन्हींचा विचार करते. कृतीचा अर्थ काय ? तिचा हेतू काय ? या दोन्हींचा अन्वयार्थ लावल्याशिवाय तत्त्वचिंतन पूर्ण होवू शकत नाही.हाच नियम व्यवसायाला लावून दोन प्रश्न विचारता येतात.

1. व्यवसायाचा अर्थ काय ?
2. व्यवसायाचा हेतू काय ?

या दोन प्रश्नाच्या उत्तरातून व्यावसायिक नीतिशास्त्राचे हेतू , स्वरप स्पष्ट होते.

थोडक्यात, 'व्यावसायिकतेचे नैतिक निकष, जबाबदाऱ्या, हक्क, तत्वे, सद्गुण इत्यादींची चर्चा करणारे शास्त्र म्डणजे 'व्यावसायिक नीतीशास्त्र' होय._अर्थात, व्यावसायिक नीतीशास्त्राचा संबंध पारंपरिक किंवा सार्वजनिक नीतीशास्त्राशी असला पाहिजे, असे एक मत आहे. म्हणजेच एकूण नैतिक जीवनाशी व्यावसायिक नीती सुसंगत ठरली पाहिजे. असा आग्रह आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ' व्यवसायासंबंधी विविध नैतिक दृष्टिकोनांचा अभ्यास करून कोणत्या व्यवसायाची कोणती नैतिक मूल्ये असावीत,ती मूल्ये व्यापक समाजहित साधणाऱ्या आदर्शवादी मूल्यव्यवस्थेशी सुसंगत कशी राहतील , याचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा म्हणजे 'व्यवसायाचे नीतिशास्त्र' होय. या नीतीचे स्वरुप समजण्यासाठी आपण प्रारंभीच व्यक्तीगत नीती व व्यावसायिक नीती यात फरक केला होता. तो इथे लक्षात घेवू.

## (1) वैयक्तिक नीती व व्यावसायिक नीती ( Personal Ethics and Professional Ethics )

नैतिक जीवनाचा विचार करताना व्यक्तीचे खाजगी व व्यावसायिक जीवन यांत फरक केला पाहिजे,अशी जाणीव प्रथम आॅर्थर हॅडली या तत्त्वज्ञाने 1907 साली लक्षात आणून दिली. ''सार्वजनिक नीतीची पातळी''('The Standards of Public Morality') या ग्रंथात तो अमेरिकन नागरीकांविषयीचे तो निरीक्षण नोंदवितो. ते असे अमेरिकन नागरीक हा खाजगी जीवनात श्रेष्ठ चारित्र्याचे दर्शन घडवितो. दुर्बलांशी आदरयुक्त सभ्यता, श्रेष्ठांशी स्वाभिमानी, स्त्रिया व मुले यांच्याशी आदर व नम्रता, मित्रांशी अत्यंत उदार अंतकरणाने, शेजाऱ्यांशी प्रेमाने असे एकूण सर्वांना उपयोगी पडणारा तो परोपकारी गंपू असतो. तो लबाडी, स्वार्थ, शुद्रता करीत नाही. आपत्तीच्या वेळी चांगला मदतनीसही असतो.

पण तीच व्यक्ती व्यापार,नोकरी,राजकारण इ. ठिकाणी तुमची प्रतिस्पर्धी असेल तर ती तुम्हाला नामशेष करते. राजकीय उलथा-पालथ किंवा सामाजिक अडचणीच्या वेळी तो तुमचा व्यावसायिक प्रतिस्पर्धी म्हणून जास्त स्वार्थी असतो. दुर्बलांना टाचेखाली आणतो तर सबलांना शरण जातो.

अशा रितीने एकाच व्यक्तीचे खासगी आणि सार्वजनिक नीतिमान वेगळे असते.हॅडलीचे अमेरिकन नागरिकाबाबतचे हे निरीक्षण किती खरे आहे किंवा भारतीय नागरिकांत तशी प्रवृत्ती आढळते का ? हा प्रश्न येथे नाही.येथे हे लक्षात घेतले पाहिजे की व्यक्तीच्या वैयक्तीक आणि व्यावसायिक वर्तनात एवढी तफावत असते


*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

---

की, या दोन अंगाचा विचार स्वतंत्रपणे सुचवतो.एखादी व्यक्ती दयाळु, प्रेमळ, करुणामय, विनयशील इ. सद्गुण असलेली असते.अशी व्यक्ती राजकारण, उद्योग, लष्कर, व्यापार, व्यवस्थापन इ. पेशा व इतर व्यवसायासाठी लायक आहेत का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. पुष्कळत: ही क्षेत्रे स्वार्थी, कपटी, धुर्त, महत्वाकांक्षी, निष्ठूर व्यक्तीसाठीच आहे.अशा क्षेत्रात यशस्वी ठरण्यासाठी स्वार्थी, कपटी लोकच हवे असतात, असा लोकांचा समज होतो.चांगली, बुध्दिमान माणसे,चारित्र्यवान माणसे दूर राहतात.



**Arthur Twining Hadley**
(April 23, 1856 – March 6, 1930
An economist who served as President of Yale University from 1899 to 1921.



या कारणांमुळे नीतिशास्त्रात असा विचार आला की, नेहमीचे पारंपरिक नीतिशास्त्र व व्यावसायिक नीतिशास्त्र यात फरक करणे आवश्यक आहे. पारंपरिक नीतिशास्त्र व्यक्तीचे खाजगी व सार्वजनिक जीवन नियंत्रित करते. पण सार्वजनिक जीवनाचे स्वरुपच असे झाले आहे की, ते जास्त व्यवसायात्मक झाले आहे. त्यामुळे या दोन प्रकारच्या जीवनात व त्यांच्या नीतित फरक करणे, आवश्यक झाले. अशाप्रकारे वैयक्तिक नीती आणि व्यावसायिक नीती यांत भेद करण्यात आला. व्यावसायिक व वैयक्तीक नीतीशास्त्रातील उपयोजित नीतिशास्त्र ज्या काही महत्वाच्या समस्याक्षेत्रांची चर्चा करते त्यात व्यवसायाचे नीतिशास्त्र आज अधिकच महत्वाचे मानले जाते.

## (2) व्यावसायिक नीतीची सामाजिक जबाबदारी :

सामाजिक जबाबदारीबाबत ही नीती विशेष भान राखते.त्याचे स्वरूप समजण्यासाठी आपण नीतीचे दोन प्रकार लक्षात घेतले पाहिजेत.

**अ) खुली / सार्वजनिक नीती** **ब) बंदिस्त / विशिष्ट नीती**

### अ) खुली / सार्वजनिक नीति

खुल्या नीतिच्या दृष्टीकोनानुसार कोणतेही नैतिक तत्व सार्वजनिक नसेल, सर्वांसाठी खुले नसेल तर त्याला नैतिक म्हणताच येणार नाही. नीती तीच की जी स्थलकाल व्यक्ती, व्यवसाय, धर्म, लिंग, जात, देश निरपेक्ष असते त्यामुळे ' व्यावसायिक नीती ' म्हणून असे काहीही स्वतंत्र नीतिशास्त्र असू शकत नाही.

### ब) बंदिस्त / विशिष्ट नीती

विशिष्ट नीतिकल्पनेनुसार नीति सार्वजनिक असू शकते.पण सार्वजनिकता हा तिचा निकष नसतो.उलट नीतीनियम नेहमी बंदिस्त विशिष्ट गटापुरतेच असतात.ही नीती उघडचं सामाजिक नीतिपेक्षा वैयक्तिक नीतीला प्राधान्य देते. त्यानुसार व्यक्तीचे हक्क, कर्तव्य, सदगुण इ. गोष्टी तिच्या सार्वजनिक भूमिकेवरुन किंवा व्यक्तीगत जीवनात ती नीतिमान आहेत, म्हणून ठरत नाही तर ती विशिष्ट गटाची सदस्य असते ; म्हणून तिचे

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

सदगुण ठरतात .उदा. विशिष्ट कामगार संघटनेचा कार्यकर्ता म्हणून एखादा कामगार केवळ त्या संबंधित कामगार संघटनेच्या सदस्यांच्या हक्क व हिताशीच निगडीत असतो.त्याचा एकूण मानवजातीचे हक्क किंवा जगातील कामगारांचे हक्क यांच्याशी संबंध नाही. तसेच दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांची जबाबदारी मानवी समाजात न्यायाची प्रस्थापना करणे ही नसून केवळ दलितांना न्याय मिळवून देण्याची आहे. कारखान्याच्या संचालकाने कारखान्याची भरभराट कशी व्हावी, हे पाहावे राष्ट्रीय उत्पन्नाची काळजी करु नये, असे बंदीस्त नीति सांगते.

अशारितीने एखादया व्यक्तीची नैतिकता सामान्य मानवी हक्क, सदगुण , कर्तव्य यातून ठरत नाही तर तिचे कुटुंब, तिचा व्यवसाय, तिचा गट व त्यातील तिचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या यातून ठरते हे लक्षात ठेवणे महत्वाचे म्हणजेच स्थलकाल व्यवसाय विशिष्ट किंवा सापेक्ष असेही नीतिचे स्वरुप ठरते. हे व्यावसायिक नीतीचे स्वरूप असते.



अशारितीने व्यावसायीक नीतिशास्त्र विकसित झाले.अर्थात असे नव्हे की, सार्वत्रिक सर्वसामान्य नीतितत्वे असूच नयेत, ती असावीत. पण त्यांचे उपयोजन मात्र व्यवसाय सापेक्षच केला पाहिजे म्हणजे सार्वत्रिक नीतिची सांगड व्यावसायिक नीतिशी घातली पाहिजे. प्राथम्य असेल ते व्यावसायिक नीतिला , सार्वत्रिक नीति ही दुय्यम असेल.

सामाजिक जबााबदारीचा परिघ केवळ ग्राहकापुरता मर्यादित नसून तो गुंतवणूकदार , नोकरदार किंवा नोकऱ्या हवे असणारे,बेकार,ठेकेदार यांच्यापर्यंत विकसित केला पाहिजे. हे सारे क्षमता असणारे ग्राहक असतात.आणि समजा आज जरी ते ग्राहक नसले तरी नंतर भविष्यकालात ग्राहक होवू शकतात.त्यामुळे त्यांच्याही हिताचा विचार हे नीतीशास्त्र करते.

## (2) व्यवसायिक नीती व ग्राहक संबंध

याचा अर्थ व्यावसायिक नीती प्राथम्याने आपल्या ग्राहकालाच जास्त महत्व देते.या भूमिकेतूनच तिची साजाजिक जबाबदारी स्पष्ट होते.समाज अनेक गटांमध्ये म्हणजेच ग्राहकांमध्ये विभागला गेलेला आहे.प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या व्यवसायाची ग्राहक असतेच.प्रत्येक व्यवसायाने आपला ग्राहक वर्ग सांभाळला, त्याचे हितसंबंध राखले की प्रत्येक ग्राहकाचे हित राखले जाईल.साहजिकच सर्व समाजाचे हित सांभाळले जाईल.त्यामुळे आधी म्हंटल्याप्रमाणे प्रत्येक व्यवसायाने केवळ आपल्या व्यवसायाचीच काळजी करावी आणि समाजाची करू नये, यातील विरोधाभास संपून जाईल. यात ग्राहकाचे हितही सांभाळले जाते आणि नीतीचे रक्षणही केले जाते.कधीकधी एकाचा ग्राहक हा दुसऱ्याचा भक्षकही असू शकतो.विशेषत: वकिली व्यवसायात दोन वकिलांना मिळणारे ग्राहक परस्पर विरोधक असू शकतात.निकाल एकाच्या विरोधात जातो म्हणूनच दुसऱ्याच्या बाजूने लागलो.विरोधात गेला तरी कायदा पाळला जातो,ग्राहकाच्या हिताची काळजी करण्याची भूमिका पार पाडली जाते. हे प्रत्येक व्यवसायात घडते.ग्राहकाचा व व्यावसायिकनीतीचा संबंधही स्पष्ट होतो. व्यावायिक नीती याप्रमाणे सामाजिक जबाबदारी पार पाडते, असे म्हणता येते.

ग्राहक म्हणजे जो खरेदी करतो आणि विक्रयवस्तूचा , सेवेचा उपभोग घेतो ती कोणतीही व्यक्ती. धर्म ,वर्ण, जात, लिंग,वय, देश इत्यादीच्या सीमा ग्राहकांनी ओलांडल्या असून कोणत्याही ठिकाणचा , देशाचा नागरिक आपला ग्राहक असू शकतो.विद्यमान ग्राहकाचे समाधान, नवा ग्राहक तयार करणे , त्याच्यात सातत्य राखणे ही महत्वाचे आहे.शिवाय व्यावसायिक आपल्या व्यवसायाचा चालक असला तरी त्यास इतर गरजांसाठी इतर व्यवसायांचे ग्राहक व्हावे लागते.त्यामुळे जणू काही काण्टचा पहिला निरुपाधिक आदेश असे समजून त्याने आपल्या ग्राहकांशी आदर्श वागले पाहिजे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*



``Always act on that maxim which you can wish at the same time to be a Law universal "

काण्टच्या मते संकल्पाचे स्वरूप असे असावे की कृतीचा नियम हा सार्वत्रिक , सार्वजनिक व्हावा.कान्टच्या मते कृती करतांना, कर्तव्य बजावतांना त्यामागील तत्व हा केवळ स्वत:लाच लागू असता कामा नये .ते सर्वांना लागू होईल असे व्यापक व आदर्श असले पाहिजे. उदा. दिलेले वचन पाळावे हे तत्व '' मला इतरांनी दिलेले वचन त्यांनी पाळावे '' असे असू नये ; तर '' प्रत्येकाने दिलेले वचन पाळावे '' असे सार्वत्रिक स्वरुपाचे असावे. तरच तो आचरणाचा नियम होईल. वचन पाळा हा कर्तव्यात्मक आदेश विवेकबुध्दी विना अट देते म्हणून कान्ट या आदेशाला *निरुपाधिक आदेश* असे म्हणतो. त्यासच तो '' नीतीचे परम तत्व '' असेही नाव देतो.

कोणत्याही व्यावसायिकाने हा आदेश पाळला तर तो एकाच वेळी चांगला ,कर्तव्यदक्ष व्यावसायिक व आणि दुसऱ्या व्यवसायाचा ग्राहक होवू शकतो. ग्राहकाचे रक्षण करणे, त्याच्या खरेदी क्षमता निर्माण करणे हे ही व्यावसायिक नीतिशास्त्राचे काम आहे.ग्राहकाला लूटून तो संपणार असेल तर पुन्हा भविष्यकालीन ग्राहकवर्गच संपेल.मग व्यवसाय करण्याचे हेतू नष्ट होतील.त्यामुळे ग्राहकहित सांभाळले गेले पाहिजे. भारतात या नीतीबाबत फारच बोंब असल्याने ' ग्राहक न्यायालये ' स्थापन करण्याची वेळ आली. 'ग्राहक हा राजा ' असला तरी त्याचे कायांतर ' भिकाऱ्यात करण्यात सर्वांची जणू स्पर्धा लागलेली असते.त्यात पुन्हा भर म्हणून ग्राहक न्यायालयाकडे सरकारचे दुर्लक्ष झाले आहे.या न्यायालयांना कायद्याच्या अनैतिकेतेने ग्रासले आहे.न्यायालयाची कर्तव्ये आणि वकिलाची कर्तव्ये बोंबलली आहेत !

## अ) वकिलाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

महत्व :

अतिशय महत्वाचा व्यवसाय असूनही सरकारचे व समाजाचे दुर्लक्ष झाले आहे. कायदा हा लोकशाहीतील मूलभूत घटक आहे.न्यायाधीश हा समाजरुपी व्यक्तिची विवेकबुध्दि असते तर वकिली त्या बुध्दिचे पोषण करणारे अन्नघटक असतात.प्रत्येक कायदेशीर कृतीसाठी वकिलाची गरज असते.नोदणी पध्दती विवाह ते जमिन खरेदी ते मृत्यू दाखला वकिलाशिवाय अपूर्ण राहातो.

वकिलीचा हेतू :

स्वातंत्र्य,समता,न्याय ही मूल्ये साध्य करुन समृध्द समाज निर्माण करणे, हा सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाचा हेतू असतो. तो सिध्द करण्यासाठी वकिलाची गरज असते.आपला अशील जिंकणे अथवा प्रतिअशील हरविणे हा हेतू न ठेवता न्याय प्रस्थापित होईल असे पाहणे,जनसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास टिकेल; असे काम करणे.

वकिलीची कर्तव्ये :

- मुख्यत: वकिली व्यवसायाचा हेतू सांभाळणे.
- अशीलास नाही न म्हणणे.त्याची केस नीट अभ्यासणे, योग्य सल्ला देणे.

- शुल्काची पावती देणे. आयकर भरणे.
- न्यायाधीश, ज्युरी यांच्याशी संपर्क न करणे.
- सहवकिलाविषयी वाईट न बोलणे.त्यांच्या व्यवसायावर अतिक्रमण न करणे.
- न्यायप्रविष्ट खटल्याशी संबंधित बाबींमध्ये लुडबुड न करणे.
- स्वत:च्या व्यवसायाची अनुचित जाहिरात न करणे.
- साक्षीदार न फोडणे,पोलिस,रुग्णालयातील कर्मचारी इत्यादी संबंधितांवर दबाव न आणणे.
- व्यवसायाची इभ्रत,आब, प्रतिष्ठा राखली जाईल,असे वर्तन करण्यावर कटाक्षाने लक्ष देणे.

वकिलीपुढील धोके :

1. खटल्याची वाढती संख्या .
2. व्यवसायांर्तगत वाईट प्रथांचे वाढते प्रमाण
3. व्यवसायाचे रुपांतर धंद्यात करण्याची चढाओढ.
4. सामाजिक जाणीवेचा अभाव
5. मुख्यत: व्यावसायिक नीतिच्या ज्ञानाचा व जाणीवेचा विकास नाही.
6. राजकीय हस्तक्षेपाचा वाढता प्रभाव

## ब) शिक्षकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :

महत्व व हेतू :

शिक्षण हा मूलभूत हक्क आहे.लोकशाहीत लोकांना शहाणे, विचारी व कर्तव्यदक्ष बनविणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू असतो.कोणत्याही सामाजिक समस्येवर शिक्षण हा उपाय समजला जातो.पण महत्व नुसत्या शिक्षणाला नसून शिक्षणाच्या गुणवत्तेला आहे.उच्च गुणवत्ता असलेले शिक्षणच समाजाला भविष्यकालाकडे नेवू शकते.राष्ट्राची निर्मिती केवळ शिक्षण व शिक्षकच करु शकतात.शिक्षण हे राष्ट्राच्या रक्षणाचे शस्त्र असते.ही भूमिका बजावण्यात शिक्षक अनिवार्य असतात.शिक्षणक्षेत्राचे दोन मुख्य घटक असलेल्या शिक्षक व विद्यार्थि यांची कर्तव्ये तपासू :

शिक्षकांची कर्तव्ये :

1. स्वत:चे ज्ञान नेहमी अद्ययावत राखणे.
2. विद्यार्थ्यांना शिकविण्यास नेहमी तयार असणे.
3. विद्यार्थी वर्गाशी नेहमीच संयमाने,प्रेमाने वागणे.
4. बेशिस्तीला आळा घालणे.नियमांचे काटेकोर पालन करणे.
5. विद्यार्थि,तरुणवर्ग,प्रौढ आणि इतर नागरिकांना मार्गदर्शन करणे.
6. सहकारी शिक्षक,वरिष्ठ अधिकारी यांच्याशी सौजन्याने वागणे.
7. वरील कोणाविषयी अफवा न पसरविणे.
8. व्यवस्थापन समिती सदस्य व कुटुंबिय यांच्याशी मैत्री न करणे.
9. किंवा असलेल्या मैत्रीचा स्वत:च्या फायद्यासाठी बाजार न करणे
10. संस्था,सरकार व राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या विरोधी न जाणे.
11. स्वत:च्या व्यवसायाची अनुचित जाहिरात न करणे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, cell : 9226563052*

12. व्यवसायाची इभ्रत,आब, प्रतिष्ठा राखली जाईल,असे वर्तन करण्यावर कटाक्षाने लक्ष देणे.

## विद्यार्थ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

1. शिक्षण हेच ध्येय राखणे.स्वत:चा बौध्दिक,मानसिक,अध्यात्मिक,सामाजिकव शारीरिक विकास ही ध्येये नीट लक्षात ठेवून शिकणे.
2. शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम आहोत, याची काळजी घेणे.
3. आपला अभ्यास व हजेरी , परीक्षा याबाबत दक्ष राहाणे.
4. शिक्षकांशी विनाकरण वाद न घालणे पण तार्किक युक्तिवादासाठी पाठपुरावा करणे.
5. शिक्षकांचा आदर करणे,त्यांचे विचार ऐकणे,मतांचा आदर करणे.
6. खुल्या मनाने नव्या विचारांचा स्वीकार करणे,नवे तंत्रज्ञान शिकणे.
7. लोकशाही वृत्ती, जिज्ञासूपणा याबरोबर आदरभाव बाळगणे.
8. सहकारी विद्यार्थि व विद्यार्थिनी याबरोबर स्नेहाने वर्तन करणे.
9. इतर विद्यार्थ्यांना धर्म,जात,लिंग,कपडे, आर्थिक स्तर, व्यवसाय इत्यादीवरुन अवमानीत न करणे.
10. प्रत्येकास योग्य त्या कायदेशीर व नैतिक मदत करणे.
11. महाविद्यालयातील व्यापक मित्रमंडळाचे भान राखून स्नेहाने संवाद करणे.
12. महाविद्यालयाच्या सर्व कार्यक्रमात सहभाग देणे.
13. कोणतेही समाजविघातक कृत्य न करणे. इ.इ.

---